|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२ (प्रतिनिधी):- कुठल्याही क्षेत्रात स्पर्धा नसते तर स्पर्धा आपली आपल्यासोबतच असते. त्यामुळे स्वतःला जेवढे सिध्द कराल तेवढे यश हमखास मिळते. यशस्वी होण्यासाठी स्वतःवर विश्वास असणे अत्यावश्यक असल्याचे मत दै.दिव्य मराठीचे वृत्तसंपादक मकरंद दंडवते यांनी व्यक्त केले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागात सोमवार, दि.२ एप्रिल रोजी आयोजित विद्यार्थी संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विभागप्रमुख डॉ.तुकाराम दौड, डॉ.सुधीर भटकर, डॉ.विनोद निताळे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मकरंद दंडवते म्हणाले, आज सर्वदूर जीवघेणी स्पर्धा आहे असे सांगितले जाते. मात्र प्रत्यक्षात स्पर्धा कुठल्याच क्षेत्रामध्ये नाही आहे. स्पर्धा आहे ती आपली आपल्यासोबतच. त्यामुळे आपल्यातील कौशल्य आणि वेगळेपण जपल्यास स्पर्धा करण्याची वेळच येणार नाही. स्वतःतील आत्मविश्वास हाच यशाचा मूलमंत्र आहे. प्रसारमाध्यमात स्पर्धा असल्याची सांगितले जाते, मात्र माध्यमात प्रत्यक्ष स्पर्धा नसून विश्वासार्हता महत्वाची आहे. जी माध्यमे लोकांमध्ये विश्वासार्हता निर्माण करतात तीच यशस्वी असल्याचे दिसून येते. तेव्हा पत्रकारितेच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांनी करिअर करतांना विश्वासार्हता आणि आत्मविश्वास या बाबीचा अंगिकार करावा असेही ते शेवटी म्हणाले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ.सुधीर भटकर यांनी विभागाच्या वाटचालीविषयी माहिती दिली. अध्यक्षीय समारोप विभागप्रमुख डॉ.तुकाराम दौड यांनी केला. सूत्रसंचालन डॉ.विनोद निताळे यांनी केले. कार्यक्रमाला एम.ए.एम.सी.जे. प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थी उपस्थित होते.

---

जा.क्र: उमवि/१६/हस्तदेय/२०१८ दिनांक : २ एप्रिल,२०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी